Review Of Research
Vol. 4 | Issue. 1 | Oct. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# अभंग : स्वरूप व व्याख्या

**बाबुराव दत्तात्रय उपाध्ये**
(सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख)
पद्व्युत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र,रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय,श्रीरामपूर ,जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

***सारांश*** — अभंग हा मराठीतील एक छंद प्रकार आहे. छंद म्हणून ओवी व अभंगाला संत साहित्यात महत्त्वाचे स्थान लाभले आहे. या पद्य प्रकारांना महाराष्ट्रातील संत कवींना विशेष आकर्षण आहे.

डॉ. रामचंद्र देखणे लिहितात, ‘‘संत साहित्याचे दालन अभंगाने जेवढे समृध्द झाले आहे तेवढेच ओवीनेही. ओवी हा अबालसुबोध साहित्य प्रकार आहे. ओवीही गद्य आणि पद्य किंवा ग्रांथिक आणि गेय अशा दोन्ही प्रकारची आहे.’’ [०१]

## ***प्रस्तावना*** :-

ओवी व अभंग हे मराठी भोषेचे खास छंद आहेत. वारकरी पंथ हा अद्वैत विचारांचा आहे. ‘संत तोचि देव। देव तोचि संत।’ ही एकरूपता या पंथात दिसते. ‘जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी परमेश्वर भरलेला आहे’ ही शिकवण अद्वैत तत्त्वज्ञानातून प्रसारित झाली आहे. ‘भगवंत आपल्याकडून सर्वकाही कृती करून घेतो’ ही नम्रतेची आणि सर्वश्रेय परमेश्वराच्या ठायी देण्याची मानसिकता या संप्रदायात आहे. या जाणिवेने ज्ञानदेवांनी ओवी गाईली आहे.

**‘‘आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे।**
**तोषोनि मज द्यावे। पयायदान हे।।’’ (अक्षरसंख्या : ८-८-७-६)**

Review Of Research
Vol. 4 | Issue. 1 | Oct. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.net

ओवी छंद अनेक मराठी स्त्रीयांनी, कवींनी, पंडितांनी, संतांनी वापरण्याचा प्रयत्न केला आहे. या छंदात नियमाचे बंधन कमी असते. साधेपणा, सोपेपणा यामध्ये असतो. (१) गेय ओवी, (२) अभंग ओवी, (३) ग्रांथिक ओवी अशा विविध स्वरूपात आपणास ओवी दिसून येते.

बहुतेक वारकरी संतांनी 'अभंग' या छंदाचाच काव्यलेखनात उपयोग केलेला आहे. अभंग गात, गात वारकरी दिंडीतून वाटचाल करून आपला भक्तिभाव व्यक्त करतो. अभंगरूप होऊन तो शेकडो किलोमीटर चालतो. थंडी, ऊन, पाऊस, वारा, भूक, तहान, कुटुंब, निवारा, व्यवसाय, पैसा आणि सांसरिक चिंता यांना विसरून तो दिंडीमध्ये सहभागी होतो.

डॉ. रामचंद्र देखणे यांनी लिहिले आहे, "अभंग हा एक छंद आहे. विठ्ठल भक्ती परंपरेत महनीयता पावलेल्या ह्या लौकिक छंदाचे नावही विठ्ठलाच्या विशेषांनी जोडले आहे. हेच अभंग आणि विठ्ठल यातील अभेद्यता दर्शवितो. अभंग म्हणजे वारक-यांचे वेद-उपनिषद आहे. अभंग म्हणजे मराठी संतांच्या पारमार्थिक आत्मचरित्राचा सागरच आहे. अभंग हा मराठी शारदेचा ठेवा आहे." [०२]

अभंग व संत यांच्या एकात्म नात्याचा अनुबंध हा भक्तिमार्गात दिसतो. अभंगात देवभेटीची आर्तता आणि आत्मोन्नतीचा प्रवास दिसतो. अभंग म्हणजे भक्ताच्या मनातील भक्तीभाव होय. अभंग हा लवचिक, सोपा आणि सुबोध वाङ् मयप्रकार आहे. अभंगवाणी म्हणजे भक्ताच्या मनातून आविष्कृत झालेली भावकविताच होय. अभंग आटोपशीर, तालबध्द व पाठांतरास सोपा वाङ् मय प्रकार आहे. संतांनी बहुजन समाजाला समोर ठेऊन त्यांना कळेल, रूचेल, पचेल अशीच शब्दशैली अभंगातून वापरली आहे.

किसन महाराज साखरे लिहितात, "संतांची अभंगवाणी भक्ती, ज्ञान, वैराग्यपर असल्याने अभंगसंहिता अत्यंत रसाळ, अलंकारसंपन्न म्हणूनच मनाला आनंद देणारी आहे. संतांचे अभंग वाङ् मय ओवीप्रमाणेच रसालंकारसंपन्न व अनुभूतीसंपन्न आहेत. अभंग संहितेची काव्यभूमिका व भक्ती, ज्ञान, वैराग्य निरूपणाची भूमिका सखोल व अर्थभरीत आहे. अभंगातून रसभाव, कल्पनाविलास, भाषासौंदर्य, सूक्ष्मनिरीक्षण, भावना व कल्पना यांचा सहभाग या सर्व गुणांचे दर्शन घडते." [०३]

संत नामदेवांनी 'जगी लावू ज्ञानदीप।' या उच्च कोटीच्या भावनेतून अभंगवाणी गाईली आहे. समाजाला भक्तिप्रवण करणे हाही उद्देश अभंग निर्मितीमागे आहे. अभंगातून नाममाहात्म्य, पंढरीमाहात्म्य, सद्गुरूवचन, जीवनदर्शन, सृष्टीदर्शन, समाजदर्शन, समाजचिंतन, भक्तीचिंतन, देवचिंतन आणि आत्मचिंतन होत असते. त्यामुळे अभंगातून संतांच्या विविध भावभावनांचा आलेख पाहण्यास मिळतो. अभंगवाणीतून संतांचे असामान्य व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते. ती एक प्रकारची शब्दचित्रेच असतात. अभंगातून लोक मनाला घातलेली सादही एकू येते आणि देवभक्तीची

आर्तताही मनाला स्पर्श करते. तत्त्वचिंतन आणि समाजचिंतनाचे संदर्भही अभंगात असल्याने या काव्याची प्रतिष्ठा वाढलेली आहे.

डॉ. सदानंद मोरे लिहितात, "संतांची अभंगवाणी ही एकीकडे शांत सागरासारखी आहे, तर दुसरीकडे वादळवा-यासारखी आहे. अभंगावली कधी कधी शांत नंदादीपासारखी तेवताना दिसते तर कधी कधी कडाडलेल्या बिजलीसारखी कोसळताना दिसते. ती अवघ्या जनांना शुध्द आचरणाचा लोकधर्म सांगते." [०४]

ईश्वरभक्तीचे साधन म्हणून संतांनी अभंगवाणी लिहिली. ती अजरामर, अभंग ठरलेली आहे. युगानुयुगे तिचा स्वर आणि भाव अबाधित राहिलेला आहे. जन-सामान्यांना आत्मसमाधान देणारी ही काव्यसंपदा म्हणजे मराठी भाषेला लाभलेले वाङ् मय वैभव आहे. उत्कट अनुभवाची प्रचिती, परमार्थप्राप्तीची ओढ व आत्माविष्काराची खोली अभंगातून पाहण्यास मिळते.

डॉ. मुकुंद दातार लिहितात, "संतांच्या अभंगवाणीने मराठी माणसाला जसे परमार्थज्ञान दिले, तसेच व्यवहार ज्ञानही दिले. भक्तियोग शिकविला तसा कर्मयोगही शिकविला. पारमार्थिक गुणांचा परिचय करून दिला. त्याचप्रमाणे सामाजिक सद्‌गुणांची ओळखही करून दिली." [०५] अशी सखोलतः, व्यापकता, सात्विकला अभंगाच्या ठिकाणी एकवटली आहे.

● **अभंगाचे प्रकार :**

अभंगाचे दोन प्रकार आहेत. १. मोठा अभंग, २. छोटा अभंग.

**१. मोठा अभंग :**

पहिल्या प्रकारात तीन, सहा अक्षरी चरण आणि चौथ्या चार अक्षरी लहान चरण अशा रचनेचा 'मोठा अभंग' याला 'देवद्वार अभंग' म्हणतात.

**"अभंगाच्या कळा नाही मी नेणत।**
**त्वरा केली प्रीत केशिराजे।।**
**अक्षरांची संख्या बोलिले उदंड।**
**अक्षरे मोजावी चौक चारी।।**
**पहिल्यापासोनि तिस-यापर्यंत।**
**अठरा गणित मोज आले।।**
**चौक चारी आधी बोलिलो मातृका।**
**बावीसांची संख्या शेवटील।।**
**दीड चरणांचे दीर्घ ते अक्षर।**

**मुकुक्षु विचार बोध केला।।**
**नामा म्हणे मज स्वप्न दिले हरी।**
**प्रीतीने खेचरी केली आज्ञा।।" -- संत नामदेव**

संत नामदेवांनी अशा अभंग रचनेला दीर्घप्रचुर म्हटले आहे. नामदेवांनी येथे अभंगाच्या रचनाशास्त्राची कल्पना मांडली आहे.

**२. छोटा अभंग :**

**"मुख्य मातृकांची संख्या।**
**सोळा अक्षरे नेटक्या।।**
**समचरणी अभंग।**
**नव्हे ताळ-छंदो-भंग।।**
**चौक फुलिता विसर्ग।**
**गण यति लघुदीर्घ।।**
**जाणे एखादा निराळा।**
**नामा म्हणे तो विरळा।।" -- संत नामदेव**

दोन समचरणावर उभा असलेला हा अभंग आहे. हा अभंग कधीही ताल-छंदोभंग पावत नाही. नामदेवांनी अशा अभंगाला विरळाच म्हटले आहे.

- **फरक :**

| **मोठा अभंग** | **छोटा अभंग** |
|---|---|
| १. संज्ञा - 'देवद्वार'. | संज्ञा - 'देवीवर'. |
| २. चार चरण असतात. | दोन चरण असतात. |
| ३.पहिल्या चरणात सहा अक्षरे असतात. | प्रत्येक चरणात आठ अक्षरे असतात. |
| ४. चौथ्या चरणात चार अक्षरे असतात. | क्वचित पहिल्या चरणात सहा किंवा सात अक्षरे आढळतात. |
| ५. दुस-या व चौथ्या चरणात शेवटी यमक असते. | दुस-या चरणात केव्हा केव्हा नऊ किंवा दहा अक्षरे येतात. |
| ६. मात्रा अक्षरगणवृत्ताप्रमाणे यातील अक्षरांचा ठराविक लघुगुरू क्रम नाही. | दोन्ही चरणात यमक असतो. |
| उदा. "जाणावा तो ज्ञानी।<br>पूर्ण समाधानी। | उदा. "अर्भकाचेसाठी। पंते हाती धरिली पाटी।। |

नि:संदेह मनी। सर्वकाळ।।"
(अक्षरसंख्या -६-६-६-४)

तुका म्हणे नाव। जनासाठी उदकी ठाव।।"
(अक्षरसंख्या -६-९-६-९)

## ● वारकरी संतांचे कार्य :

मध्ययुगीन कालखंड हा संत-पंत-तंत कवितेचा म्हणून ओळखळा जातो. इ.स. ६८० पासून मराठी भाषेचे अस्तित्व सापडले असल्याचे सांगितले जाते. इ. स. १०१२ च्या आधीच्या शिलालेखात मराठी वाक्य मिश्र स्वरूपात आढळले. इ. स. १११६ मध्ये श्रवणबेळगोळच्या शिलालेखात कोरलेले 'श्री चावुण्डराजे करविले' हे पहिले मराठी लिखित वाक्य सापडते. इ. स. ११२८ च्या यशच्चंद्र पंडिताच्या 'राजमतीप्रबोध' या संस्कृत नाटकात (गुजरात) महाराष्ट्रीय स्त्रीचे वर्णन आहे. इ. स. ११२९ मधील 'अभिलाषितार्थ चिंतामणी' या संस्कृत ग्रंथात रागतालाची माहिती देताना मराठी पदे दिलेली आहेत. इ. स. ११८८ मध्ये मुकुंदराजाचा 'विवेकसिंधू', इ. स. १२८३ मध्ये महानुभावांचा 'लीळाचरित्र' आणि इ. स. १२९० मधील 'ज्ञानेश्वरी' अशा ग्रंथनिर्मितीपर्यंतच्या वाटचालीत मराठी भाषा विकसित होत आली. महानुभावानंतर वारकरी संतांनी भक्तिवाङ् मय निर्माण केले. त्यातील काही वारकरी संतांच्या कार्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### अ) संत ज्ञानदेव (इ.स. १२७५ ते इ.स. १२९६):

संत ज्ञानदेवांचे मूळचे घराणे आपेगावचे. त्यांचा जीवनकाळ आळंदीला गेला आहे. विठ्ठलपंत व रूक्मिणीबाई कुलकर्णी यांना चार अपत्य झाली. (१) निवृत्तीनाथ, (२) ज्ञानदेव, (३) सोपानदेव, (४) मुक्ताबाई ही अपत्ये संन्यासधर्म स्वीकारल्यानंतर पुन्हा संसारधर्म स्वीकारल्यावर झालेली असल्यामुळे आळंदीच्या ब्राह्मणांनी त्यांना वाळीत टाकले. विठ्ठलपंत व रूक्मिणीबाईने आळंदीच्या ब्राह्मणांनी सांगितल्याप्रमाणे देहत्याग केला, पण या अपत्यांचा वनवास संपला नाही. या चारही भावंडांनी पैठनहून शुध्दीपत्र आणले. आळंदीस जाताना त्यांनी प्रवरातिरी नेवासा येथे ज्ञानेश्वरांनी १६ व्या भगवतगीतेचे तत्त्वज्ञान निरूपण करताना 'ज्ञानेश्वरी'चा जन्म झाला.

## ● ज्ञानदेवांचे वाङ् मय :

### १. ज्ञानेश्वरी (इ. स. १२९०) :

भगवतगीतेच्या १८ व्या अध्यायातील सातशे श्लोकांवर ज्ञानदेवांनी नऊ हजार ओव्यांमध्ये 'ज्ञानेश्वरी' सारखा भाषाग्रंथ लिहिला. संत नामदेवांनी या ज्ञानदेवांच्या लेखनाला 'ज्ञानदेवी', 'ज्ञानेश्वरी', 'गीताटीका' असे शब्द वापरले. हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहे, हे 'देशीकार लेणे' आहे. 'ज्ञानेश्वरी'मध्ये भावमनाचा ओलावा आहे. म्हणूनच की काय तिला 'भावार्थदीपिका' असे

म्हणतात. ‘ज्ञानेश्वरी’चा मुख्य सिध्दांत अद्वैत स्वरूपाचा आहे. ‘सर्वत्र एकच तत्त्व भरून राहिले आहे.’ आत्माच सर्वत्र भरलेला आहे. ज्ञानदेव हे तत्त्वज्ञ कवी होते. ‘ज्ञानेश्वरी’ कर्म, ज्ञान व भक्तीचा सुंदर समन्वय साधला आहे. ‘ज्ञानेश्वरी’च्या शेवटच्या अध्यायात मागितलेले पयायदान म्हणजे विश्वकल्याणकारी भूमिकाच आहे. ‘ज्ञानेश्वरी’मध्ये शांत, भक्ती व वत्सल रसांना प्राधान्य आहे. यातून ज्ञानेश्वर हे भक्त, तत्त्वज्ञ व कवी व्यक्तिमत्त्वाचे होते.

**२. अमृतानुभव (इ. स. १२९२) :**

ज्ञानेश्वरांची ही स्वतंत्र प्रतिभेची निर्मिती आहे. निवृत्तीनाथांच्या गुरूच्या आज्ञेतून या ग्रंथाची निर्मिती झाली. ‘ज्ञानेश्वरी’पेक्षा ‘अमृतानुभवा’च्या तत्त्वज्ञानाने उंची गाठली आहे. या ग्रंथाला ज्ञानदेवांनी ‘अनुभवामृत’ असे म्हटले आहे. हा ग्रंथ पाच संस्कृत श्लोक व ८०४ ओव्यांचा आहे. हा ग्रंथ दहा प्रकरणात विभागला आहे. हा ग्रंथ पारमार्थिकांसाठी आहे. ‘जीवही परब्रह्मरूप आहे’ हे या ग्रंथात सांगितले आहे. हा ग्रंथ शुध्द तत्त्वज्ञानाचा असल्याने तो सामान्य जनापासून दुर्लक्षित राहिला आहे.

**३. चांगदेव पासष्टी (इ. स. १२९४) :**

ज्ञानदेवांची कीर्ती ऐकून योगी चांगदेवांनी त्यांना कोरेच पत्र पाठविले. निवृत्तीनाथांच्या आज्ञेने ज्ञानदेवांनी उत्तरपत्र पाठविले. ६५ ओव्यातून पाठविलेले हे पत्र म्हणजेच ‘चांगदेव पासष्टी’ होय. अमृतानुभावे तत्त्वज्ञान येथे सूत्रबध्दपणे आलेले आहे. हे ‘तर्कशुध्द सार’ आहेत.

**४. अभंगवाणी :**

ज्ञानदेवांनी ७६५ अभंग लिहिले आहेत. पंढरीच्या संतमेळ्यात वावरताना हे अभंग रचले गेले आहेत. विठ्ठल, पंढरीवर्णने आहेत.

**“रूप पाहता लोचनी। सुख झाले हो साजणी।**
**तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा।**
**बहुता सुकृताची जोडी। म्हणून विठ्ठल आवडी।**
**सर्व सुखाचे आगरू। बापरखुमादेविवरू।।”**

हा ज्ञानदेवांचा कलात्मक सौंदर्याचा आविष्कार करणारा सुंदर अभंग आहे. ज्ञानदेवांनी ‘बालक्रीडेच्या अभंगा’त अनेक रूपके चित्रित केली आहेत. टिपरी, पाळणा, घोंगडी, फुगडी अशा रूपकाद्वारे भक्तीचे तत्त्वज्ञान सांगितले. ‘हरिपाठाच्या अभंगा’तून वैराग्याचे विचार ज्ञानदेवांनी

सांगितले आहेत. हे अभंग म्हणजे नीतीबोध आहे. संत ज्ञानदेवांचे वाङ् मय मराठी भाषेची श्रीमंती आहे.

**ब) संत नामदेव (इ.स. १२७० ते १३५०) :**

नामदेवांचा जन्म मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात नरसी बामणी येथे झाला. शिंपी कुळातील दामाशेठी व गोणाई यांच्या या मुलाने बालपणीच विठ्ठलाशी संवाद साधला. त्यांना ईश्वराचा छंद लागला. पत्नी राजाई, मुले नारा, विठा, महादा, गोविंद, मुलगी लिंबाई, सूना व दासी जनाबाई असे १५ जनांचे कुटुंब होते. ते ८१ वर्षे जगले. त्यांनी लिहिलेले २५०० अभंग उपलब्ध आहेत.

नामदेवांच्या अभंगात विविधता आहे. आत्मचरित्रपर अभंग, साधकदशेतील अभंग, बाळक्र ीडेचे अभंग, पदे, गौळणी त्यांनी लिहिल्या आहेत. 'आदी-तीर्थावळी-समाधी' या प्रकरणातून त्यांनी ज्ञानेश्वरचरित्र सांगितले आहे. नामदेवांची अभंगवाणी म्हणजे अमृताची खाण आहे. त्यात भक्तिभावनेचा ओलावा आहे. नामदेवांनी वारकरी संप्रदायाचे कार्य सर्वदूर पंजाबपर्यंत नेले. नामदेवांचे काही अभंग ग्रंथसाहिबमध्ये आहेत. त्यांनी नामसंकीर्तनाची परंपरा सुरू केली. ते मराठीतील पहिले भावकवी तसेच पद्यचरित्रकार, आत्मचरित्रकार, अरण्याककवी असल्याचे म्हटले जाते. विठ्ठलभक्तीचा प्रसाद त्यांनी सर्वदूर केला.

- **संतमेळ्याची कविता :**

संत ज्ञानेश्वरांनी १३ व्या शतकात आध्यात्मिक लोकशाहीची निर्मिती केली आणि अठरापगड जातीतील संत पुढे आले. गोरा कुंभार (इ.स. १२६७ ते १३०९), सावतामाळी (इ.स. १२५० ते १२९५), नरहरी सोनार (इ.स. १३१३), संत चोखामेळा, कर्ममेळा, सेना महाराज, विसोबा खेचर, परिसा भागवत, त्याचप्रमाणे मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, निर्मळा, सोयराबाई, बहिणाबाई, वेणाबाई, भागू महारिन अशा संत कवयित्रिंनी भक्तीकविता लिहिल्या. संतांच्या सहवासात या संतमेळ्याची कविता विठ्ठलभक्तीने रंगली आहे.

संत मेळ्याच्या कवितेविषयी अ. ना. देशपांडे लिहितात, ''सामान्यांना, कोणत्याही प्रकारची सामाजिक, आर्थिक, राजकीय वा धार्मिक प्रतिष्ठा नसलेल्यांना एक दार मात्र उघडे होते. भक्तीचे हे दार सगळ्यांना, शूद्रांना, अतिशूद्रांना, पतितांना, स्त्रियांना, भ्रष्टांना नेहमी मोकळे आहे, असे संतांनी सांगितले. हे भक्तीचे दार उघडून, संतांनी सामान्यातल्या सामान्यांची, उपक्षितांची, पतितातल्या पतितांची, सगळ्याच अगतिकांची, सामाजिक आणि मानसिक गरज भागविण्याचे केवढे थोर आणि उदात्त कार्य केले आहे.'' [०६]

संतमेळ्यातील कविंनी आपली भक्ती भावना व्यक्त करताना आपल्या जीवनचरित्राचे संदर्भही सांगितले आहेत.

**"कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।।**
**लसून मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी।।**
**मोट नाडा विहिर दोरी। अवघी व्यापली पंढरी।।**
**सांवता म्हणे केला मळा।**
**विठ्ठलपायी गोविला गळा।।"**

संतांनी आपली भक्तिभावना साध्यासोप्या भाषेत व्यक्त केली आहे. आपल्या मनातल्या वेदना त्यांनी सांगितल्या आहेत.

**"ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।**
**काय भुललासी वरलीया रंगा।।"**

हा चोखोबाचा अभंग सर्वांना भक्तीचे माहात्म्य सांगतात. संतमेळ्याच्या कवितेचे मोल सांगताना गं. बा. सरदार लिहितात, "संत चळवळ ही सामाजिक लढ्यापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कासाठी पध्दतशीरपणे झगडणारी सुधारणावादी प्रवृत्तीच होती." [०७] या उद्‌गारात संतमेळ्याच्या कवितेचे मूल्य जाणवते.

**क) संत तुकाराम (इ.स. १६०८ ते १६५०) :**

संत तुकाराम हे वारकरी संप्रदायाच्या कार्याचे कळस ठरले. तुकाराम बोल्होबा आंबिले हे देहू गावचे रहिवाशी. तुकारामांच्या घरात आठव्या पूर्वजापासून विठ्ठलभक्ती सुरू होती. बोल्होबा व कनकाई यांना सावजी, तुकाराम व कान्होबा ही तीन मुले झाली. आईवडिलांच्या निधनानंतर सावजी विरक्त झाले. संसारत्याग करून ते निघून गेले. इ. स. १६२९-३० च्या दरम्यान देहू गावाच्या आसपास मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे तुकारामांच्या जीवनात मोठे बदल घडले. त्यांच्या घरची सावकारकी गेली. दुकानदारी गेली. त्यांनी लोकांची गहानखते जाळून टाकून कुळांना ज्याची त्याची शेती देऊन टाकली. दुष्काळामध्ये आईवडील, पहिली बायको रखुमाबाई व मुलगा संतोबा मरण पावले. भावजयी वारली. तुकारामांनी कुटुंबाची वाताहत पाहिली. दुसरी बायको आवडी-जिजाई भांडखोर स्वभावाची होती. बाईल कर्कशा निघाल्याने तुकोबा संसारापासून विरक्त झाले. विठ्ठलभक्तीत ते रंगून गेले, अभंगरचना केली.

तुकारामांच्या गाथेत ४५०० अभंग आहेत. त्यांनी पंढरीलाच माहेर मानले, विठ्ठलनामाचा गरज केला. तुकारामांची कविता मराठी माणसांची प्रतिष्ठा आहे.

आचार्य प्र. के. अत्रे म्हणतात, "ज्ञानेश्वर माऊली ही भागवत धर्माचा श्वास तर तुकाराम महाराज निःश्वास. मराठी भाषेतून आणि जीवनातून ज्ञानोबा तुकोबा जर वजा केले तर काय बाकी राहील." [०८]

Review Of Research
Vol. 4 | Issue. 1 | Oct. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.net

संत तुकारामांची विचारधारा ही एका भक्ताची असली तर त्यांच्या एक लोकशिक्षक आहे. ते धर्मसुधारक व समाजसुधारक म्हणून विचार व्यक्त करतात. धर्म म्हणजे लोककल्याणाचे साधन आहे. खोट्या प्रवृत्तीवर प्रहार करताना तुकाराम लिहितात,

**“ऐसे कैसे जाले भोंदू। कर्म करोनि म्हणती साधू।।**
**अंगा लावूनिया राख। डोळे झाकुनी करिती पाप।।**
**दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयाची सोहळा।।**
**तुका म्हणे सांगो किती। जळो तयांची संगती।।”**

तुकारामांनी शुध्दी भक्तीच्या प्रचारासाठी प्रयत्न केले. स्पष्ट जाणीवपूर्वक धर्मसुधारणा सांगितल्या तशीच तुकारामांची कविता प्रभावी आहे. डॉ. किशोर सानप लिहितात, ‘‘त्यांची कविता वेळप्रसंगी विद्रोह आणि बंडखोरीची भाषा बोलायला लागली. कोणत्याही प्रकारे दडपण न ठेवता त्यांच्या कवितेने सत्याचे उद्‌गार गिरवले.’’ [०९] अशी तुकारामांची कविता समाजकल्याणाला व शब्दधनाला महत्त्व देणारी आहे.

शब्दाविषयी तुकाराम लिहितात,

**“आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने।**
**शब्दांचीच शस्त्रे यत्न करू।**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।**
**शब्दे वाटू धन जन लोका।।”**

यासारख्या अभंगातून तुकारामांनी शब्दांना देव मानले. त्यांनी केलेले समाजप्रबोधन फार मौलिक ठरले. त्यांच्या अभंगात १२०० उपदेशपर अभंग आहेत. ‘बुडती हे जन न देखवे डोळा।’ ही तळमळ त्यांच्या अभंगात दिसते. भक्तीभावना व समाजकल्याण त्यांच्या अभंगाच्या मुळाशी आहे.

संत तुकारामांनी वारकरी संप्रदायाला प्रतिष्ठा मिळवून दिली. मध्ययुगीन कालखंडातील ते खरे शेवटचे वारकरी संत ठरतात. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांच्या सांस्कृतिक कार्याची वाट पुढे गतिशील ठेवली. तुकारामांच्या प्रभावाने निळोबा, शिष्या बहिणाबाई, महिपती इत्यादींनी वारकरी पताका फडकवत ठेवली. मध्ययुगीन वाङ् मयामध्ये वारकरी संतांचे कार्य वाङ् मयनिर्मिती, भक्तीसंप्रदायाची बांधणी व समाज प्रबोधनाचे आहे. मराठी वाङ् मयाला अभंग वाङ् मयाचे समृध्द करणारी वारकरी चळवळ आजही प्रभावीपणे सुरू आहे.

- **समारोप :**

संतांनी ओवी व अभंग या काव्यप्रकारातून भक्तीभाव व्यक्त केला. वारकरी संप्रदायाने अभंगनिर्मितीद्वारे विठ्ठलभक्ती महाराष्ट्रात जनसामान्यांच्या मनात रूजविली. समाजातील अठरापगड जाती या संप्रदायाची शक्तीस्थळे ठरली. बहुजन समाज भक्तिमार्गात कृतिशील करण्यात

त्यांच्या भक्तीतून अभंग निर्मितीचे वारकरी संप्रदायाचे कार्य फारच मौलिक ठरले. वारकरी संतांनी आपल्या कवितेतून समाजाला नीतीमूल्यांची शिकवण दिली. समाजजीवनात नीतीची संस्कृती निर्माण करणे हीच भक्ती मानली. सर्वत्र एक ब्रह्मतत्त्व भरून राहिलेले आहे. हे अद्वैत तत्त्वज्ञान या संतांनी सांगितले. संत ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई या भावंडांनी ओव्या, अभंगरचना केली. संतमेळ्याला व त्यांच्या भक्तीकाव्याला आपलेसे मानले. पंढरीच्या पांडुरंगाची भक्ती देशकार्याची व समाजजागृतीची शक्ती बनविली. अनेक कवयित्रिंनाही आपल्या जीवनाचे साफल्य कशात आहे त्याची प्रचिती आली. स्त्रियांना, शूद्रांना एकत्र शक्ती देणा-या वारकरी संप्रदायाच्या काव्यनिर्मितीच्या कार्याला जगात तोड नाही, इतके हे अपूर्व कार्य आहे.

● **संदर्भटीपा :**

१. रामचंद्र देखणे, 'वारी : स्वरूप व परंपरा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे ३८, २००७, पृ. ५९.
२. तत्रैव, पृ. ५७.
३. किसनमहाराज साखरे, 'श्री ज्ञानेश्वर विरचित अमृतानुभव - चांगदेव पासष्टी, हरिपाठ', अभंगगाथा प्रकाशन, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी देवाची, प्रकाशक बा. ज. पंडित, पुनर्मुद्रण १९८९, प्रस्तावना पृ. १०-११.
४. सदानंद मोरे, 'तुका म्हणे', लेखक डॉ. मुकुंद दातार, स्नेहल प्रकाशन, पुणे ३०, १९९९, प्रस्तावना पृ. ११.
५. मुकुंद दातार, 'तुका म्हणे . . . .', स्नेहल प्रकाशन, पुणे ३०, १९९९, पृ. २४.
६. अ. ना. देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ् मयाचा इतिहास', उत्तरार्ध, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६९, पृ. १६७.
७. गं. बा. सरदार, 'संत वाङ् मयाची सामाजिक फलश्रुती', विद्या प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती, १९८५, पृ. १७.
८. प्र. के. अत्रे, उद्धृत, 'जगद्गुरू श्री संत तुकाराम स्मारक ग्रंथ', (संपादक ॲड. शैलजा ज्ञानेश्वर मोळक), प्रकाशक, जिजाऊ ग्रंथालय, पुणे १५, १५ फेब्रुवारी २००९, संपादकीय मनोगत, पृ. १६.
९. किशोर सानप, 'तुकाराम - व्यक्तित्त्व आणि कवित्त्व', श्रीनिवास कॉलनी रोड, रामनगर वर्धा, १९९५, पृ. ४७.